# प्रा. तात्याराव सूर्यवंशी यांच्या 'तुझे गीत गाण्यासाठी' कवितासंग्रहातील निवडक कवितांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. अभय सुभाष जोशी**
*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ*
*joshi@gsgcollege.edu.in*

**प्रस्तावना**

मूळ नांदेड जिल्ह्यातील उंचेगाव (बु.), ता. हदगाव येथील आणि यवतमाळ जिल्ह्यातील सवना, ता. महागावच्या श्री विठ्ठल रुक्मिणी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातून इंग्रजीचे प्राध्यापक व विभाग प्रमुख या पदावरून सेवानिवृत्त झालेले प्रा. तात्याराव सूर्यवंशी हे अत्यंत निष्ठापूर्वक काव्य साधना करणारे एक महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी. वरिष्ठ महाविद्यालयात इंग्रजीसारख्या कठीण विषयाचे अध्यापन करून विद्यादानाचे पवित्र कार्य करताना त्यांची प्रतिभा बहरली, फुलली आणि त्यांच्या प्रतिभेने एकाहून एक सरस कविता संग्रह रसिक चरणी अर्पण केले. 'पुत्र अमृताचे', 'सूर्य सत्य', 'हे राष्ट्र प्रेषितांचे' हे कवितासंग्रह आणि 'आकाशी झेप घे रे पाखरा' हे त्यांचे आत्मवृत्त. ही रसिकांनाही समृद्ध करणारी त्यांची साहित्य संपदा. "वाट्याला आलेले जगणे सहर्ष स्वीकारून दुःखाशी दोन हात करीत उद्याच्या सुखासाठी महन्मंगल स्तोत्रे गाणारी भावरम्य कविता आहे 'तुझे गीत गाण्यासाठी'..." 1 अशा समर्पक शब्दात प्रा. अभय जोशी यांनी या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत या कवितेची करून दिलेली सविस्तर ओळख सार्थ ठरते. ०१ जानेवारी २०२१ रोजी त्यांचा नवा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे, 'तुझे गीत गाण्यासाठी' या कविता संग्रहातील काही निवडक कवितांचा चिकित्सक अभ्यास या शोधनिबंधाच्या निमित्ताने करायचा आहे.

'तुझे गीत गाण्यासाठी' कवितासंग्रहातील निवडक कवितांचा चिकित्सक अभ्यास :-

प्रा. तात्याराव सूर्यवंशी यांच्या 'तुझे गीत गाण्यासाठी' या कवितासंग्रहामध्ये जगण्याचे आश्वासन देणाऱ्या व जीवनाचे गीत गाणाऱ्या अनेक कविता आहेत. यामधून कवी केवळ जीवनावर प्रेम करीत नाही तर आपल्या असे लक्षात येते की, ते आशावादी असून वाट्याला जे येईल, ते जीवनक्षण समर्थपणे सामोरे जाऊन मनसोक्तपणे व सकारात्मकतेने जगणारे आहेत.

'उमेद' या कवितेतही याचा प्रत्यय आपल्याला येतो. संग असंगाशी असला आणि रोजच युद्धप्रसंग असला तरी उरामध्ये ठाम उमेद शिल्लक असून लढायचा चंग बांधला आहे, असे ते म्हणतात.

दिसतो भणंग आम्ही बोला परी नेक |
वैशाख वणव्यात पळस रंगारंग|
उधळीते रंग उषा झुगारी मळभ|
झेप आमुची नभी रे अभंग उमंग||
(पृ. क्र. २)

जगण्याचे गाणे गाताना स्वतःवर भक्कम विश्वास असलेले कवी सगळ्या वादांपासून स्वतःला दूर ठेवताना 'ब्रीद' या कवितेत म्हणतात...

नाही राहिला कोणताच वाद आता |
माझ्याच पावलांची ऐकतो साद आता ||
(पृ. क्र. ७)

तर 'दीपराग' या कवितेत ते म्हणतात,

उभारले धाम, ना फुलविली बाग|
काटे वेचले मी, शमविली आग||
(पृ. क्र. ९)

पुण्य होते म्हणून हा मानव जन्म लाभला, हे कवी अतिशय विनम्रपणे सुचवतात. आता जाग आणावयाला पायी फुले आहेत. हे ते सहजपणे लिहून जातात.

'हे लोक माझे' या कवितेत त्यांनी आपल्या मनातील व्यथा आणि शल्य मांडले आहे. ते मुळातून वाचण्यासारखे आहे. ते लिहितात...

दळून जीव जात्यात हजाराला छळतात लोक |
जाळून जीव आगीत चांदणे उधळतात लोक ||
(पृ. क्र. १०)

तसेच,

मिरवत पायी काटे, कुरूप जगणे बेहोष |
परार्थ उपकारा मरणावर उसळतात लोक ||
(पृ. क्र. १०)

एकूणच आपले जगणे असे कधी कधी असह्य होऊन जाते की, काय करावे ते सुचत नाही. आपलीच माणसे आपल्याला छळतात आणि आगीत आपला जीव जळून चांदणे उसळतात. ही व्यथा अगदी सहजपणे त्यांनी मांडली आहे. ते लिहितात की, आपले

मरण थबकते दिग्मुढ होऊन जागी |
जळून उजळतात तेव्हा कळतात लोक ||
(पृ. क्र. १०)

सध्याचा काळ खूप कठीण आला आहे. कसे जगावे ते कळत नाही. आता काळच असा कोपला आहे, की माणूस संपला. जो आपला आहे असे वाटते, तोच आपला गळा कापतो. हा आपला जीवनानुभव मांडून 'जागर' या कवितेत ते लिहितात...

भरू पाहतो सागर, फुटकी माझी घागर |
स्वप्नाचा मी सौदागर, करू पाहतो जागर ||
(पृ. क्र. ११)

मानवी जीवनाला व्यापून उरणारे सर्व विषय प्रा. तात्याराव सूर्यवंशी यांच्या कवितेत अधोरेखित होतात. तद्वतच मानवी जीवन मूल्यांचाही विचार त्यांच्या कवितेने केला आहे, असे आपल्याला दिसते. इतर मूल्यांसह 'सत्य' या मानवी मूल्याचा जयघोष करणारी ही कविता म्हणूनच महत्त्वाची वाटते. 'पत्त्यावर' या त्यांच्या कवितेत ते लिहितात,

अढळ श्रद्धा ज्याची सत्यावर आहे |
सद्गृहस्थाच्या मी पत्त्यावर आहे ||
(पृ. क्र. १२)

इथे सत्तासुंदरीच्या मागे लागलेले संधी साधू आपल्याला जागोजागी दिसतात. त्याचवेळी चारित्र्य मात्र रस्त्यावर धूळ खात पडलेले दिसते. सामान्य माणसाला, उघड्या - नागड्या, वंचित, गरिबांना इथे कोणत्याही प्रकारचे मूल्य, किंमत नसून त्यांची कोणतीही किंमत आजचे वर्तमान करत नाही. त्यांचे जगणेच इथे मातीमोल ठरते. मात्र त्याच वेळी इथे चांगले कपडे जर परिधान केले तरच त्याला इथे महत्त्व प्राप्त होते, ही खंतही या ठिकाणी कवी व्यक्त करतात. हे आजचे कवीने चितारलेले वास्तव आपल्यालाही अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही.

आजचे अस्वस्थ वर्तमान हे कवीला काव्य निर्मिती करण्यासाठी प्रेरक ठरते. हे आपल्याला त्यांच्या 'वेग' सारख्या कविता वाचल्यानंतर प्रत्ययाला येते. आजचा काळाचा प्रवाह हा इतका बदललेला आहे की, मी कसा संवाद साधू? हे मला कळत नाही. कारण तेवढा माझा वेग नाही, असे कवी सांगतात.

गोमटी घरे रंगी-बेरंगी बाहुल्या सजलेल्या |
अनाथ नाथ सारे मायबापात लेक नाही ||
(पृ. क्र. १७)

आजच्या आधुनिक काळात सगळे काही बदलले गेले आहे, परंतु इथं माणसाचा माणसाशी संवाद नाही. कोणाचेही मन कोणासाठी द्रवत नाही. सगळ्या गोष्टी आता बदलत चाललेल्या आहेत, त्याचबरोबर...

प्रवासी औटघटकेचे हे शोधात सुखाच्या |
धावबाद ठावे कोणाला लक्ष्मणरेघ नाही ||
(पृ. क्र. १७)

सामान्य माणूस म्हणून जगत असताना, आपल्या जगण्याकडे डोळसपणे पाहणारे कवी एकूणच आजचे बदलते, अस्वस्थ करणारे वर्तमान समजून घेताना आपली खंत कवितेमधून व्यक्त करतात. ते लिहितात,

ना अभिलाषा स्वर्गाची ना भीती नरकाची ही||
दुःख याचे, माझे असून हे माझे जग नाही ||
(पृ. क्र. १७)

'शहाणपण' या कवितेतून कवीने एकूण अनुभव आल्यानंतरच माणसाला शहाणपण येते, हे सांगताना त्यांनी अनेक प्रकारचे दाखले दिलेले आहेत. प्रचिती आल्याशिवाय कुणाला इथे शहाणपण येत नाही. अर्थात झिजल्याशिवाय चंदनालासुद्धा महानपण प्राप्त होत नाही, हे कवी अगदी सहजपणे सांगून जातात. तसेच स्वतःचे लहानपणही अगदी सहजपणे मान्यही करतात; हे इथे अधोरेखित करण्यासारखे आहे.

मी फिरेन दाही दिशा कधीतरी लिलाव माझा |
स्वीकारेल कोण गारगोटीचे गहाणपण येथे ||
(पृ. क्र. १८)

अर्थात जीवनातील काही सत्य समजावून सांगताना त्यांनी अनेक सुंदर असे दाखले दिलेले आहेत. जरा - जर्जर म्हातारपण जरी अभिशाप असला तरीही इथे कोणालाही कायमचे लहानपण मागून मिळत नाही. डोक्यावरील केसांना जर कोणी काळा रंग लावला तर ती फक्त तारुण्याची शान शौकी ठरते. परंतु अशा हातचलाखीने कधीच म्हातारपण लपत नाही. मातृत्वाचे सोंग कसे आणता येईल? उदराला काहीतरी बांधून स्त्रीला गर्भारपण येत नाही. जगताना जो तो इथे हातचे राखून दान देतो. पण हे लक्षात घेत नाही की, त्यागानेच सागरासारखे उदारपण मिरवावे लागते. हे लोकांना कळत नाही.
हे सांगून कवी लिहितात की,

खोड मेल्याविना जात नसते, कधी जित्याची |
ठोकर लागल्याविना आले कोणा शहाणपण येथे ||
(पृ. क्र. १८)

'अंगाई नाही' या कवितेतून आई नसल्याचे दुःख कवीने छोटी छोटी उदाहरणे देऊन सहजपणे चितारले आहे. ते मुळातून वाचण्यासारखे आहे.

ताई, बाई, दाई आहे, मज आई नाही |
दंगलगाणी, मंगल गाणी आहे, पण अंगाई नाही||
हरपल्या चिऊ, काऊ, मोत्या, चिमणी, माऊ |
झाडे झुडपे ना फुलपाखरे, गुलाब जाई नाही ||
(पृ. क्र. १९)

सामान्य माणूस म्हणून जगताना शेवटी आपण माणूस म्हणून जन्माला आलो आहोत आणि माणुसकी हाच खरा धर्म आहे, हे अगदी सहजपणे ही कविता सांगून जाते.

मी माणूस, तू माणूस, एक माणूस मानतो मी |
माणसाचा माणुसकी धर्म, हा धर्म मानतो मी ||
(पृ. क्र. २०)

आपले सुख - दुःख, स्वप्न एक आहे, जल - वायू, रक्त एक आहे. हे सांगून जात, पंथ, देव, धर्म सगळे भेद बाजूला ठेवून ईश्वराच्या सगळ्या लेकरांना थोर मानणारा हा कवी आहे. सर्व वृक्षवल्ली, पशु - पक्षी हे सर्व जीव एक आहेत. त्यामुळे असा एकत्वाचा वेद सर्वांच्या डोळ्यांमध्ये वाचणारा हा कवी, एक जग, एक नभ, सर्वांचे अन्न एक, हवा पाणीही एक असून उच्च-नीचतेचा भेद मानणे याला कवी पाप मानतो. म्हणून आपण सर्व एक असून, एक राहून एकत्वाचा मंत्र राखणे आवश्यक आहे. सर्व चराचरातील अणू - रेणूचा एकच पंथ पाहणारा हा कवी आणि म्हणून शस्त्र, शास्त्राहून माणुसकीला कवी थोर मानतो आणि म्हणतो...

साह्य करू एकमेका उद्धारू विश्व हे |
कल्याण साकल्याचे आहे, ब्रीद मानतो मी ||
(पृ. क्र. २०)

कवीची चिंतनशील प्रवृत्ती या पूर्वीच्या संग्रहातील कवितांप्रमाणेच याही कवितांमध्ये आपल्याला तीव्रपणे जाणवते. 'इमान आमचे देव - देश - धर्म आहे', असे सांगून या मातीचे आणि मातृभूमीचे गाणे गाताना त्यांच्या प्रतिभेची झळाळी आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही.

'तुझे गीत गाण्यासाठी' या संग्रहाची शीर्षक कविता असलेल्या कवितेत ते लिहितात...

तुझ्या त्यागे कृषी पुत्रा आम्हा दोन घास ओठी |
शब्द सुर ताला आस तुझे गीत गाण्यासाठी ||
(पृ. क्र. ०१)

सारांश, अशाप्रकारे एकूणच आपले सारे जगणे समृद्ध करणारी ही प्रा. तात्याराव सूर्यवंशी यांची कविता आहे. माणूस सारा एक असून 'माणुसकी' हा धर्म मानणारा कवी सगळ्या विश्वातील एकात्मभाव प्रकट करून जातो. जीवन प्रवास निरंतर चालणारा असून शेवटच्या क्षणापर्यंत निरंतर चालत राहणे आहे, याची जाणीव कवी बाळगून आहे. तरीही माणुसकी लोपली आणि आमची मने मेली, यासारखी दुसरी हानी नाही, याचे दुःख ते प्रकट करून जातात. शेतकरी राजा जगाचा पोशिंदा असून त्याच्या कल्याणासाठी जवळ या; असे आवाहन ते करतात. माणसाने आपले तेच तेच दुःख त्याच जात्यात पुन्हा पुन्हा का दळावे? उलट धीराने, ठामपणे जगावे. ही रणभूमी सोडून दूर पळू नये, हा आशावाद मांडणारा हा कवी आहे. सुखाच्या पाठीमागे धावून कोणाला सुख मिळत नाही, हे सत्य सांगणारा अन् तरीही मी मूढ अती पतीत असून मला कसलीही शुद्ध नाही, हे सावळे विठाई, होऊ कसा उतराई? या शब्दांमध्ये ते इश्वराची करुणा भाकतात. 'करीत हात आव्हानाशी मी पुढे जात आहे, जुळवीत सूर जीवनाशी मी गीत गात आहे.' अशा शब्दात जगण्यात आशावाद पेरणारा अन् जीवन फुलविण्यासाठी उरात नवी उमेद आहे, हे सांगणारा, हा कवी आहे. संध्याकाळच्या सावल्यांनी अस्वस्थ होणारा हा कवी, आता महात्माजींच्या देशाची दुर्दशा झालेली पाहून व्यथित होतो. निवडणुका, राजकारण ही आता चेष्टेची बाब झाली असून सत्तेत कोणताही पक्ष असो, देशाला आता कोणी वाली उरला नाही का? अशी खंत स्पष्टपणे मांडणारा, आपल्या जन्म-मृत्यूवर स्पष्टपणे भाष्य करणारा, दुष्काळाने आणि अवकाळी पावसाने जिणे कठीण झाल्याने मनाची व्यथा प्रकट करणारा, खऱ्या अर्थाने जीवनगाणे गाणारा हा कवी आहे. नव्या युगाचे भान असलेला तरीही परंपरेतील सुंदरता टिपणारा, मानवतेचे महन्मंगल स्तोत्र गाणारा हा कवी आहे. त्यांचे जीवनासह कवितेतील लयीवरही प्रेम आहे. त्यामुळेच या कवितांना स्वतःची अशी एक 'लय' आहे. चाल आहे. 'तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे...' ही भावना मनात दरवळत असताना या संग्रहातील सर्व कविता वाचल्याशिवाय आपण राहत नाही. हेच या कलाकृतीचे यश असून प्रा. तात्याराव सूर्यवंशी सरांच्या इतर कविता वाचण्याची आपल्याला ओढ लागते आणि हा या कवीचा पुरस्कार आहे. एकूणच जगण्याचे नवे आश्वासन देणारी प्रा. तात्याराव सूर्यवंशी यांची कविता रसिकाला पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटते. त्यांच्या कविता केवळ वाचनाचाच आनंद देत नाही तर जगण्याचे नवे भानही देतात आणि समृद्ध करून टाकतात, हे महत्त्वाचे वाटते.

**संदर्भ :-**

(१) जोशी प्रा. अभय, प्रस्तावनेतून, 'तुझे गीत गाण्यासाठी' (कवितासंग्रह) कवी - प्रा. तात्याराव सूर्यवंशी, प्रकाशक - सुदर्शन प्रकाशन, उमरखेड, जिल्हा यवतमाळ, प्रथमावृत्ती - ०१ जानेवारी २०२१

(२) 'तुझे गीत गाण्यासाठी' (कवितासंग्रह) कवी - प्रा. तात्याराव सूर्यवंशी, प्रकाशक - सुदर्शन प्रकाशन, उमरखेड, जिल्हा यवतमाळ, प्रथमावृत्ती - ०१ जानेवारी २०२१